# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषय : आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वार्षिक अर्थसंकल्प प्रस्तावाबाबत....**

वित्त व लेखा विभागाने संदर्भ क्र. वित्त/अर्थसंकल्प/२०२०-२१/८६७ दि.११/११/२०२० च्या निर्गमित केलेले अर्थसंकल्प परिपत्रक तसेच प्रशासन- शिक्षककक्ष परिपत्रक क्र.३४०/२०२० दि.०९/१२/२०२० नुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वार्षिक अर्थसंकल्प प्रस्ताव सादर करते वेळी खालील महत्वाचे बदल करण्यात आलेले आहेत.

१) अर्थसंकल्प प्रस्ताव संचालक, प्रशाळा यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात यावे.

२) विभागीय विकास प्रस्ताव सादर करताना विकास तरतुदीमधून खरेदी करण्यात येणाऱ्या शास्त्रीय सामग्री व उपकरणे/कार्यालयीन साधने व उपकरणे, पुस्तके, Software संगणक प्रणाली आज्ञावली इ. यांची यादी सोबत जोडण्यात यावी.

३) वरील संदर्भ परिपत्रकानुसार दिलेल्या प्रपत्र अ,ब,क,ड नुसार प्रस्ताव सादर करण्यात यावा.

४) संचालक, प्रशाळा यांच्या स्वाक्षरी शिवाय स्वतंत्रपणे कोणत्याही विभागाचे अर्थसंकल्प प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत.

**आपल्या शैक्षणिक / प्रशासकीय विभागाचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात भरावेत. विभागीय समितीच्या शिफारशीसह उचित तरतुदीचा प्रस्ताव मा. संचालक, प्रशाळा यांच्यामार्फत पाठविण्यात यावा.**

विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख व प्रशासकीय शाखाप्रमुख, केंद्रित व विकेंद्रित वित्तशाखा प्रमुख व इतर संबंधितांनी वरील बदललेल्या सूचनांची नोंद घेवून आपल्या विभागाचे प्रस्ताव **एक प्रतीमध्ये** अर्थसंकल्प कक्ष, मध्यवर्ती वित्त विभाग यांचेकडे **दि. २६ डिसेंबर, २०२० पर्यंत** पाठवावेत. अपूर्ण माहिती भरलेले, सही व विभागाचे नाव (शिक्का) नसलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. दिलेल्या कालमर्यादेत प्रस्ताव न पाठविल्यास प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही. **कालमर्यादेचे बंधन विचारात घेऊन प्रस्ताव पाठविण्याबाबत वित्त व लेखा विभागास सहकार्य करावे, ही विनंती.**

11/12/2020

**सीए अतूल पाटणकर**
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे ४११००७
जा.क्र.वित्त/अर्थसंकल्प/२०२०-२१/
दिनांक : ११ डिसेंबर, २०२०

**सोबत-** प्रपत्र- अ, ब, क, ड

D:\Dr.Bhagwat\Budget other papers/paripatrak